(७१)

TPV-7 ...

नगर रचना आणि मुल्यनिर्धारण विभाग
मु.का., पुणे-१. आवक क्र. ...............
टिपीव्ही -१/२/३/४/५/६/७
७५०१
13 JUN 2024
पुशा -१/१अ/२/शाखा/अर्थसंकल्प
कार्यासन मु प्र.अ./उ सं न र./सं न.र

**प्रादेशिक योजना, पुणे.**

महाराष्ट्र प्रादेशिक नियोजन व नगर रचना अधिनियम, १९६६ चे कलम २०(३) अन्वये फेरबदल प्रसिध्द करणेबाबत...

मौ. भिवरी, ता. पुरंदर, जि. पुणे येथील गट नं. ५८५, ६१६, ६१७ , ६२०, ६२२, ६२६, ६२७, ६२८, ६२९, ६३०, ६३१, ६३२, ६३३, ६४६, ६४७, ६६२ व ६६३ मधील एकुण क्षेत्र **२४.०३** हे. आर क्षेत्र शेती तथा नाविकास विभागातून वगळुन रहिवास विभागात समाविष्ट करणेबाबत.

**महाराष्ट्र शासन**

**नगर विकास विभाग**

सहसंचालक, नगर रचना, पुणे विभाग, पुणे यांचे कार्यालय.

२१२, दुसरा मजला, नविन प्रशासकिय इमारत, विधान भवनासमोर, पुणे - ४११००१

निर्णय क्र.प्रा.यो.पुणे/मौ. भिवरी/ ग.नं. ५८५ व इतर/ कलम २०(३)/ सहसंपुवि/८५५

दि.११.०६.२०२४

**निर्णय** : सोबतची शासकिय सूचना महाराष्ट्र शासन राजपत्रामध्ये प्रसिध्द करावी.

नगर रचना आणि मुल्यनिर्धारण विभाग
उ.स. ...क, नगर रचना (मा.सं.प्र.)
जा.क्र. 1057 दिनांक- 20.06.24
संबंधित अधि./कर्म.

वरील 'A' प्रमाणे कार्यवाही ... 15/6/24

( रा. म. पवार )
सहसंचालक, नगर रचना,
पुणे विभाग, पुणे.

प्रति.

१) मा. प्रधान सचिव (नवि-१), नगर विकास विभाग, मंत्रालय, मुंबई -३२.

२) मा. संचालक, नगर रचना, महाराष्ट्र राज्य, पुणे.

३) उपसंचालक, नगर रचना, नागरी संशोधन घटक, पुणे.
/- त्यांना विनंती करण्यात येते की, सदरचे आदेश नगररचना, संचालनालयाच्या संकेतस्थळावर प्रसिध्द करण्याची कार्यवाही करावी.

'A'

४) जिल्हाधिकारी, पुणे.

५) अवर सचिव, नगर विकास विभाग, (नवि-१३) मंत्रालय, मुंबई.
/- त्यांना विनंती करण्यात येते की, सदर सूचना शासनाच्या वेबसाईटवर प्रसिध्द करण्याबाबत कार्यवाही करण्यात यावी.

६) सहायक संचालक, नगर रचना, बारामती शाखा, बारामती.

७) व्यवस्थापक, शासकीय मुद्रणालय, येरवडा कारगृह, पुणे ४११ ००६.
/- त्यांना विनंती करण्यात येते कि, सोबतची शासकीय सूचना महाराष्ट्र शासन राजपत्राच्या भाग-१, पुणे विभागीय पुरवणीमध्ये प्रसिध्द करण्यात यावी व त्याची प्रत या कार्यालयास पुरविण्यात यावी.

**महाराष्ट्र शासन**

**नगर विकास विभाग**

सहसंचालक, नगर रचना, पुणे विभाग, पुणे यांचे कार्यालय

२१२, दुसरा मजला, नविन प्रशासकिय इमारत, विधान भवनासमोर, पुणे – ४११ ००१.

**सूचना**

**महाराष्ट्र प्रादेशिक नियोजन व नगर रचना अधिनियम, १९६६**

सूचना क्र.प्रा.यो.पुणे/ मौ. भिवरी/ ता.पुरंदर/ ग.नं. ५८५ व इतर/ कलम २०(३)/ सहसंपुवि/९५५

दि. १७ .०६.२०२४

ज्याअर्थी, महाराष्ट्र प्रादेशिक नियोजन व नगर रचना अधिनियम, १९६६ (यापुढे ज्यास "उक्त अधिनियम" असे संबोधले आहे), मधील तरतूदीनुसार पुणे जिल्हयाची प्रादेशिक योजना (यापुढे ज्यास "उक्त प्रादेशिक योजना" असे संबोधले आहे) शासनाने दि. २५.११.१९९७ रोजी मंजूर केली असून, ती दि.१०.०२.१९९८ पासून अंमलात आलेली आहे;

आणि ज्याअर्थी, उक्त प्रादेशिक योजनेनुसार मौ. भिवरी, ता. पुरंदर, जि. पुणे येथील गट नं. ५८५, ६१६, ६१७, ६२०, ६२२, ६२६, ६२७, ६२८, ६२९, ६३०, ६३१, ६३२, ६३३, ६४५, ६४६, ६४७, ६६२ व ६६३ मधील एकुण क्षेत्र **२४.९९** हे. आर क्षेत्र (यापुढे ज्यास "उक्त जमीनी" असे संबोधले आहे) शेती तथा नाविकास विभागातून वगळुन रहिवास विभागात समाविष्ट करणेबाबत श्री. भागवत व्यंकट गुट्टे व इतर २५ यांनी दि. ११.०७.२०२३ रोजी या कार्यालयास विनंती केलेली आहे;

आणि ज्याअर्थी, राज्यात मंजूर असलेल्या प्रादेशिक योजनांमध्ये उक्त अधिनियमाचे कलम २० अन्वये वेळोवेळी कराव्या लागणाऱ्या जमीन वापराच्या फेरबदला संदर्भाने करावयाच्या कार्यपध्दतीबाबत उक्त अधिनियमाचे कलम १५४ अन्वये शासन निर्णय क्र. टिपीएस-१८१५/ प्र.क्र.४९/ १५/ नवि-१३, दि.०६.०५.२०१५ व दि.०४.०१.२०१६ अन्वये शासनाने निर्देश दिलेले आहेत, (यापुढे ज्यास "उक्त शासन निर्णय" असे संबोधले आहे), व त्याअनुषंगाने शासनाने "प्रस्ताव छाननी समिती" गठीत केली आहे;

आणि ज्याअर्थी, गट नं. ६४५ मधील क्षेत्र हे मे.तालाब फ़र्म्स या विशेष नगरवसाहत प्रकल्पात येत असल्याने अर्जदारांचे विनंतीनुसार उक्त ग.नं. ६४५ मधील क्षेत्र फ़ेरबदलातून वगळणेची विनंती पुणे महानगर प्रदेश विकास प्राधिकरण, पुणे यांनी दि. ०२.०१.२०२४ रोजीचे पत्रान्वये केलेली आहे;

आणि ज्याअर्थी, उक्त अधिनियमाचे कलम २० पोट कलम (२) मधील तरतूदीनुसार, उक्त जमीनी, पेकी गट नं. ६४५ वगळून उर्वरित क्षेत्र **२४.०३** हे. जमिनी 'शेती तथा नाविकास विभागातून' वगळून खालील अटींच्या अधीन राहून, 'रहिवास विभागात' समाविष्ट करण्याचे प्रस्तावित असून, त्या अनुषंगाने उक्त प्रादेशिक योजना सुधारित करणे आवश्यक आहे (यापुढे ज्यास "उक्त फेरबदल" असे संबोधले आहे), असे उक्त शासन निर्णयान्वये गठीत "प्रस्ताव छाननी समिती" चे मत झाले आहे;

**अटी** -

१) शासन निर्णय दि.०६.०५.२०१५ व दि.०४.०१.२०१६ तसेच वेळोवेळी निर्धारीत केलेले अधिमूल्य, शुल्क व शासन निर्णयातील सर्व अटी, जमिनधारक/ विकासक यांचेवर बंधनकारक राहतील.

२) जिल्हाधिकारी, पुणे, मुख्य अभियंता महाराष्ट्र जीवन प्राधिकरण प्रा.वि., मुख्य अभियंता सार्वजनिक बांधकाम प्रा.वि., मुख्य अभियंता जलसंपदा प्रा.वि., सहायक संचालक, नगररचना, बारामती शाखा या कार्यालयांचे अनुक्रमे दि. २०.१०.२०२३, दि. २७.०७.२३, दि.२८.०८.२०२३, दि.०३.१०.२०२३, दि. ०५.१०.२०२३ रोजीच्या पत्रातील अटी जमिनधारक/ विकासक यांचेवर बंधनकारक राहतील.

३) पुणे महानगर प्रदेश विकास प्राधिकरण, यांचे सद्यस्थितीत लागू असलेल्या मंजूर विकास नियंत्रण व प्रोत्साहन नियमावलीतील तरतूदीनुसार आवश्यक १०% खुली जागा क्षेत्रा व्यतिरीक्त १५% क्षेत्र सुविधा भूखंड स्वरुपात राखुन ठेवणे व सुविधा भूखंडातील किमान १ एकर क्षेत्रात दवाखाना, २ एकर क्षेत्रात प्राथमिक शाळा व उर्वरित सुविधा भूखंड क्षेत्र उक्त विकास नियंत्रण नियमावलीनुसार अनुज्ञेय वापराकरिता विकसीत करणे अर्जदारावर बंधनकारक राहील.

४) प्रस्तावित संपूर्ण जागेत एकत्रीतपणे रेखांकन (plotting) स्वरुपाचा रहिवास विकास करणे अर्जदारावर बंधनकारक राहील.

५) प्रस्तावातील अनोंदणीकृत कुलमुखत्यारपत्रे दुय्यम निबंधक यांचेकडे नोंदणीकृत करुन त्याचे सत्यप्रती अंतिम मान्यतेपुर्वी सादर करणे अर्जदारावर बंधनकारक राहील.

६) सदर प्रस्ताव सादर करतेवेळी दि.०६.०५.२०१५ रोजीच्या शासन निर्णयासोबतचे अनुसूची 'क' नुसार दि.११.०७.२०२३ रोजी सादर केलेल्या हमीपत्रानुसार मान्य अटींचे पालन करणे अर्जदारावर बंधनकारक राहील.

७) कलम २०(४) ची सूचना निर्गमित करणेस मान्यता मिळालेचे पत्र प्राप्त झाल्यापासून एक वर्षाचे आत अधिमूल्याची रक्कम न भरलेस सदर क्षेत्र फेरबदलाचा प्रस्ताव अधिसूचनेन्वये नामंजूर करणेबाबतची कलम २०(४) ची कार्यवाही करणेत येईल.

आणि ज्याअर्थी, शासनाने उक्त अधिनियमाचे कलम १५१ पोटकलम (१) अन्वये निर्णय क्र.टिपीएस-१८१५/ प्र.क्र. ४९/ १५/ नवि-१३, दि. ११.०६.२०१५ नुसार उक्त अधिनियमाचे कलम २०(२), २०(३) व २०(४) खालील अधिकार विभागीय सहसंचालक, नगर रचना यांना प्रदान केलेले आहेत;

आणि त्याअर्थी, याबाबतीत शासनाने प्रदान केलेल्या अधिकारानुसार, उक्त अधिनियमाच्या कलम २० चे पोटकलम (३) अन्वये, सहसंचालक, नगर रचना, पुणे विभाग, पुणे उक्त प्रादेशिक योजनेत उक्त फेरबदल करण्याचा हेतू या सूचनेव्दारे घोषीत करीत असून उक्त प्रस्तावित फेरबदलाच्या अनुषंगाने नागरिकांकडून सूचना/हरकती, ही सूचना महाराष्ट्र शासन राजपत्रात प्रसिध्द झाल्याच्या तारखेपासून ३० दिवसांच्या मुदतीत लेखी स्वरुपात मागविण्यात येत आहेत ;

हरकती / सूचना **सहायक संचालक, बारामती शाखा, बारामती, मुख्य इमारत, प्रशासकीय भवन, तिसरा मजला, बारामती – ४१३१०२** यांच्या कार्यालयाकडे पाठवाव्यात. उक्त प्रस्तावित फेरबदल दर्शविणारा नकाशा नागरिकांच्या अवलोकनार्थ त्यांचे कार्यालयात कार्यालयीन वेळेत उपलब्ध आहे. प्रस्तुत फेरबदलाबाबत विहीत मुदतीत प्राप्त होणाऱ्या सूचना/हरकतींवर सुनावणी देण्यासाठी व वैधानिक कार्यवाही पूर्ण करुन त्यांचा अहवाल सदस्य सचिव यांचेकडे सादर करण्यासाठी सहायक संचालक, बारामती शाखा, बारामती यांना "अधिकारी" म्हणून प्राधिकृत करण्यात येत आहे.

प्रस्तुतसूचना www.dtp.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध आहे.

**(रा.म. पवार)**
सदस्य सचिव, प्रस्ताव छाननी समिती
तथा
सहसंचालक, नगर रचना,
पुणे विभाग, पुणे